ति. आई आण्णांस , व

प्रि. डॉ. बी. एल. पाटील

सौ. अनुराधा पाटील

यांस.......

# प्रमाणपत्र

कु. विजया पांडुरंग पाटील यांनी “आशा बगे यांच्या कादंबरी वाङ्मयाचा अभ्यास, ‘भूमी’ या कादंबरीच्या आधारे” या विषयावर माझ्या मार्गदर्शनाखाली हा प्रबंध पूर्ण केला आहे. हा प्रबंध शिवाजी विद्यापीठाच्या एम्. फिल. पदवीसाठी (मराठी) सादर करण्यास मी अनुमती देत आहे. त्यांचे प्रबंधाचे काम पूर्णावस्थेमध्ये आहे. तो सादर करण्यास कोणताही अडथळा नाही याची मला खात्री आहे.

स्थळ :- सातारा.

दिनांक:- २२।११।२००८

मार्गदर्शिका

प्रा. डॉ. सौ. हेमलता रामचंद्र गायकवाड

सातारा.

डॉ. सौ. एच

छ. शिवाजी

(एम. फि

# CERTIFICATE

This is to Certify that Miss. Vijaya Pandurang Patil was a regular student of M. Phil (Marathi) during the academic year 2006-07 and 2007-08 To the best of my knowledge she bears a good Moral Character.

Place :- SATARA.

Date :- 22 NOV 2008

Principal,

Chh. Shivaji college,

SATARA

# प्रतिज्ञापत्र

**"आशा बगे यांच्या कादंबरी वाङ्मयाचा अभ्यास 'भूमी' या कादंबरीच्या आधारे"** या विषयावरील शोध-प्रबंध मी शिवाजी विद्यापीठाच्या एम्. फिल. (मराठी) पदवी परीक्षेसाठी लिहिला आहे. हा लघु-शोध-प्रबंध अथवा त्यातील कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही व कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

स्थळ :- सातारा.

दिनांक :- 22।११।२००८

(विजया पांडुरंग पाटील)

अभ्यासक

# भूमिका

"आशा बगे यांच्या कांदबरी वाङ्मयाचा अभ्यास, 'भूमी' या कादंबरीच्या आधारे" असे निवडलेल्या लघु – शोध प्रबंधाचे शिर्षक आहे. त्यासाठी आशा बगे यांची २००६ ला "साहित्य अकादमी"चा पुरस्कार मिळवलेली 'भूमी'साहित्यकृती निवडलेली आहे.

आधुनिक काळातील आशा बगे यांच्या सारखी स्त्री लेखिका सातत्याने लिहिताना आपल्या साहित्यातून स्त्रियांच्या विविध स्वभावदर्शनाचा नैसर्गिकपणे उलगडा करताना दिसतात. त्यांच्या कथा–कादंबरीतून येणारी व्यक्तिचित्रणे, संवादकौशल्य भाषाशैली, निसर्गवर्णन या वाङ्मयीन वैशिष्ट्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न आहे. श्रीमती आशा बगे यांच्या कथा आश्रय देणारे व आश्रीत लोक, घराणेशाहीतील वातावरण, समंजस, सुशिक्षित स्त्रिया, पती किंवा पित्याचे घर यांच्या शिवाय स्वत:च्या पायावर धडाडीने उभी राहणारी या आशयाच्या आधारे सामाजिक दृष्टीने, वाङ्मयीन दृष्टीने परामर्श घेण्याचा मानस आहे. विषयाची विविधता कथानकचा ओघ याबद्दल विविध प्रश्नांची उकल करण्याचा प्रयत्न करणार आहेत.

# प्रास्ताविक

कोणत्याही भाषेतील साहित्याचा समग्र अभ्यास करीत असताना त्या – त्या भाषेतील मुद्रित वाङ्मय परंपरेचा अभ्यास करणे आवश्यक असते. काही वर्षापासून मराठी साहित्याभ्यासाला महत्व प्राप्त झालेले आहे. वाङ्मय प्रकाराचे महत्व लक्षात आल्याने कथा, कादंबरी, नाटक, कविता, लघुनिबंध इत्यादींचा अभ्यास अनेक अंगाने सुरू असलेला दिसतो. त्यातील एक वाङ्मय प्रकार म्हणून कांदबरीचा वाङ्मयीन दृष्टीने 'भूमी' कलाकृतीचा अभ्यास करणे प्रस्तुत प्रबंधाचा मुख्य हेतू आहे. आजपर्यंत सकंलीत केलेल्या मराठी कादंबरीचा हा अभ्यास करत असताना आधाराला घेतलेली आहे. अशा या वैविध्यपूर्ण कलाकृतींचा अभ्यास खुल्या स्वरूपात करणे शक्य नाही कारण या आधी म्हटल्याप्रमाणे कादंबरी वाङ्मयातील "आशा बगे" यांची कलाकृती घेऊन स्त्री – पुरुष पात्रांच्या परस्पर संबंधांचा विचार आवश्यक ठरतो. प्रस्तुत कादंबरी 'भूमी' चा अभ्यास करत असताना कुटूंबव्यवस्था, समाजव्यवस्था, धर्माचे काटेकोर नियमात बांधले गेल्याने कौटूंबिक समस्या, मध्यमवर्गियांचे जीवन, नाती–गोती, भावनिक ताणतणाव, माणसा–माणसातील नात्यांचा शोध व त्यांच्या संबंधांचा शोध आशा बगेंनी कसा घेतला आहे ते पाहण्याचा विचार आहे.

माझ्या शोध–प्रबंधासाठी माझ्या गुरूवर्या डॉ. सौ. हेमलता गायकवाड यांचे सुरूवातीपासून मार्गदर्शन लाभले त्यांनी वेळेचे कोणतेही बंधन न पाळता संशोधनासाठी मोलाचे मार्गदर्शन केले. त्याच बरोबर डॉ. कन्हैया कुदंप (सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड.) यांचेही मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. विश्वनाथ शिंदे ,डॉ. कृष्णा किरवले, डॉ. रविंद्र ठाकूर, डॉ. रणधीर शिंदे, प्रा. हिमांशू स्मार्त तसेच छ. शिवाजी महाविद्यालय, सातारा येथील डॉ. शिवाजी पाटील, डॉ. नलिनी महाडीक, डॉ. शुभांगी भुतकर, प्रा. मानसी लाटकर यांचे सहकार्य लाभले.

मला विशेषत: आवर्जून उल्लेख करताना अतिशय अभिमान वाटतो. ज्यांच्या मार्गदर्शनामुळे व वेळोवेळी मिळणाऱ्या प्रोत्साहनामुळे मी हे काम करू शकले ते माझे काका प्रि.डॉ. बी. एल. पाटील (सामान्य प्रशासन रयत शिक्षण संस्था सातारा) व सौ. अनुराधा पाटील यांनी सहकार्य केले. त्याबद्दल मी मन:पुर्वक ऋणी आहे तसेच माझे तिर्थरूप आई आण्णा, भाऊ विकास, राहूल, बहिण जयश्री, मुलगा सुमेध याच्या सहकार्यामुळे सदरचा प्रबंध सिध्दीस नेऊ शकले.

तसेच छ. शिवाजी कॉलेज ग्रंथालय यांच्या सहकार्यामुळे मला संशोधनाच्या काळात संदर्भग्रंथ मिळण्यामध्ये कोणतीच अडचण मला जाणवली नाही. सदर प्रबंधाची आकर्षक बांधणी ........... कॉम्प्युटर टायपिंग अत्यंत कमी वेळेत करून देणारे साई कॉम्प्युटर सौ. विद्या शिंदे व त्यांची सहकारी कु.श्रध्दा लोखंडे यांची मी मन:पूर्वक आभारी आहे.

दिनांक :- (विजया पांडुरंग पाटील)

स्थळ :- सातारा.